म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४८८



REFBK-0024000
REFBK-0024000

# ओॲसिस

शोभा सुराणा

सदभ काव्य
२४९९
२४०००
९३।१०।८३

# ओॲसिस

शोभा सुराणा

REFBK-0024000
REFBK-0024000

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९९
दा. क्र. २४०००
काव्य ९३।१०।८३
शाखा (स्थळ प्रत)

पारिजात

**प्रकाशक :**
के. विजय अंबाडे
पारिजात पब्लिकेशन्स्
ब्लॉक नं. ३, ५७६, शिवाजीनगर
जंगली महाराज रोड
पुणे ४११ ००४.
दूरध्वनी : ५२८८१

© प्रकाश मजेठिया
२९०, शहीद भगतसिंह रोड
रूम नं. १८/१९, दुसरा मजला, कुमठा स्ट्रीट, फोर्ट
मुंबई ४०० ००१.

**मुद्रक :**
दामोदर अनंत घळसासी
वृंदा प्रिंटर्स
६३५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.

**मुखपृष्ठ :** अनिल उपळेकर

**ब्लॉक/छपाई :**
व्ही. जोशी, ब्लॉक-मेकर्स
पुणे ४११ ०३०.

**मांडणी :**
के. विजय अंबाडे

**प्रकाशन-काळ :** मार्च १९८३

**किंमत : दहा रुपये**

---

श्रेय : प्रा. य. प्र. कुलकर्णी, सतीश बोरा, जी. एन्. देशपाण्डे, किशोर पाठक, अरुण शेवते, सुहास पाठक, उत्तम कोळगावकर, धनंजय गोवर्धने. सुजाता देशपांडे आणि अनुराधा आफळे.

पाठीवर वेदनांचे आभाळ पेलून
माझ्या गालांतल्या खळ्या जपणाऱ्या
ती. भाऊसा आणि सौ. बाईला...

– शोभा

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या
नवलेखक अनुदान योजनेखाली अनुदान मिळालेले आहे.

# स्वागत

माझी तरुण मैत्रीण शोभा सुराणा हिने आवर्जून मला पाठवलेल्या कविता मी अनेकवार मनःपूर्वक वाचल्या.

आभाळात मळभ आलेले असावे, वारा पडलेला असावा, झाडाचे पानही हलू नये आणि जिवाची तगमग व्हावी, तशी एक बेचैन उदासी या कविता वाचताना आणि वाचल्यानंतरही अंतर्यामी जाणवत होती.

ही अवघी कविता म्हणजे एका अतीव संवेदनशील मनाने स्वतःशीच केलेले भावार्त स्वगत आहे. प्रकट चिंतन आहे. यौवनाच्या सीमेवर वावरणाऱ्या नवथर पण भावप्रवण मनाच्या व्यथा-वेदनांचा, व्याकूळ भावानुभवांचा आणि पालटत्या भाव-स्थितीचा आलेख या कवितेत भरून राहिलेला आहे. प्रीतीच्या पहिल्यावहिल्या स्पर्शाचे दाहक चटके, जखमेत रक्त साकळावे, तसे तिच्या शब्दाशब्दांत साकळले आहेत. इथे मनाचे आभाळ नेहमीसाठीच दाट सावल्यांनी झाकोळलेले, भारावलेले आहे. आणि डोळ्यांचे तळे गच्च भरलेले आहे. आठवणींचे बहर मनाच्या फांदो-फांदीला असे लगडलेत, की सारे आयुष्यच त्यांनी ओथंबून आले आहे. खरे तर फुलण्याचे, झुलण्याचे हे रंगभरले दिवस. पण इथे मेंदी काही केल्या रंगलीच नाही, मग उरल्या केवळ उदास आठवणी. या जीवनाला आणि या भावजीवी मनाला फार काही नाकारले गेले आहे, अव्हेरले गेले आहे; जपण्यासारखी एकही भावार्द्र स्मृती इथे जवळ नाही, मग हे झुरणारे, व्याकुळणारे मनच दवात भिजलेली पहाट होते. पहाटेत गारठलेले दव होते. हे मन मांडलेल्या घरटयाच्या काडयाकाडया आठवणी-दाखल जपणारे असले, तरी मोडल्या घरटयाची तिरडी काळजात सुद्धा बांधायची नसते, हे विवेकी शहाणपणही इथे या नव्या नव्हाळीतच उमगले आहे. पण व्यवहारी जगात जगणाऱ्याचे गणिती हिशेब या मनाशी जुळत नाहीत. माणसे जिवंत असता-नाच त्यांचे कलेवर मात्र जपण्याची या व्यवहारी जगाची रीत या मनाला पटत नाही. माणूस बाजूला राहतो, त्याची अक्षरे तेवढी जपली जातात, ही कटु जाणीव या हळव्या मनाला सलत राहते. या आयुष्याला सोबत आहे, ती थरथरत्या हाताने गोळा केलेल्या मूठभर आठवणींची आणि संगतीला आहे डोळयांतले खारे पाणी. तरीही एक जीवघेणा प्रश्न उरतोच. मूठभर आठवणी आठवायला इतक्या जन्मांचा प्रवास करावा लागला, मग त्या विसरायला किती जन्म लागतील ? उत्तर न सापडणारा हा प्रश्न आपल्या मनालाही बेचैन केल्यावाचून राहात नाही.

वैफल्याचा, निराश रिक्ततेचा एक भावार्त सूर या कवितांतून भरून राहिला आहे. मन उद्ध्वस्त झाले, आयुष्य भकास झाले आणि अस्तित्वालाच रंगबधिरता आली, तरी आपण रेखलेल्या या रांगोळीचे ठिपके न् ठिपके व रेषा न् रेषा या उत्कट मनाने जपल्या आहेत, ढगांच्या स्पंदनातून, वळवाच्या पावसातून; पण सतत व्यथेनेच सोबत केल्याने या डोळ्यांत केवळ वाळवंट भरून राहते आणि घरटया-

कडे किलबिलत परतणाऱ्या पाखरांचीच काय ती संगत उरते. पाखरांच्या चोची चोचीत अडकलेल्या असल्या, तरी त्याच्या अंगणाला तिच्या देहाच्या सावल्या मात्र परक्या झालेल्या असतात. प्रीतीची मनोमन बांधलेली पूजा या कवितेच्या प्रत्येक शब्दातून उमटली आहे, पण पूजेसाठी आभाळफुलं खुडताना अनावर हातांनी आभाळच खुडलं जातं आणि कोसळलेला सूर्य त्याच्याच डोळ्यांत वसतीला येतो. आभाळाच्या भकास पोकळीत ती आपल्याच अस्तित्वाचे दगड भरडत राहते, म्हणून तर आभाळ घरघरत असतं, या विलक्षण कल्पनेत या वैराण जीवनाचीच कहाणी सामावली आहे. उद्ध्वस्त होणे, झडून जाणे अटळ असले, तरी तिने पेरलेल्या प्रत्येक बीजामध्ये फुलत्या फळत्या झाडाची आशा रोवून, रुजवून ठेव, 'मी अडताना मात्र तू बीजा-बीजांतून झाडांची आशा रोव' या ओळी जितक्या भावपूर्ण, तितक्याच मनाला अंतर्मुख, चिंतनशील करणाऱ्या वाटतात. डोळ्यांत केवळ वाळवंट भरून राहिल्याने, 'मी आता चंद्राची वाटही पाहात नाही' अशी कबुली शांत मनाने दिली जाते. आता रानपाखरांनीही तिच्याच कुशीचा आधार घेतला आहे, आता तीच त्यांची मैत्रीण आहे. तिच्याच कवेमध्ये ही रानपाखरं आपल्या झडलेल्या पंखांची पिसं मोजत राहतात आणि ती आपल्या उद्ध्वस्त जिवाची शकलं जपत राहते. 'आमचं आभाळ खुडलं गेलंय् ना' हेच या दोघांचंही एकच दुःख आहे, एकच मुका आक्रोश आहे, हा मुका आक्रोश आपल्याही काळजाचा ठाव घेतल्या-वाचून राहत नाही. कारण पंख झडलेल्यांचा आभाळावर अधिकार नसतो, आभाळ त्यांच्यासाठी नसतं, हे विवेकी शहाणपणही इथे आधीच उमगलेलं आहे, त्यामुळेच की काय, ही व्यथा अधिकच कातर होऊन मनाला भिडते. ओठ दाबून हुंदके मागे परतवणाऱ्या निरागस बालकाकडे पाहून वाटावे, तसे वाटू लागते. पहिल्यावहिल्या भेटीचे दूर गेलेले स्वप्न हे मन अजून आठवते, दिशांचे रंग, चांदण्यांचे आकार, नेत्रांचे पूर, सारेच आठवत राहते. त्या आठवणींत ती ओलीचिंब गारठून जाते, पण शेवटी उरते, ते सत्य एकच, की आयुष्याचे एक भटके पर्व तू भिजवून टाकलेस. निरांजन गोठून गेले. आभाळ संपून गेले. मग उरते फक्त डोळ्यांची भाषा; पण प्रीतीसाठी हा अटळ दुःखभोग सोसणाऱ्या मनाला त्याच्या आठवणींच्या धारदार कंगोऱ्यांनी केलेल्या जखमांचा सलही हवाच आहे. जेव्हा काहीच उरत नाही, तेव्हा जखमांचा आधारही हवाहवासा वाटतो. या कवितेतून व्यक्त होणारी मनाची संवेदन-क्षमता, हळवी कातरता, मितभाषी भावार्द्रता इतकी सूक्ष्म व उत्कट, की तिच्याशी समरस होताना तसेच भावकोमल मन घेऊन यावे लागते. 'पावसाचे पाणी छातीवर अडवशील, पण आठवणींचे पावसाळे कुठे ठेवशील ?' हा गहिरा प्रश्नही मनात असाच रेंगाळत राहतो. आठवणींच्या या कल्लोळात आजची तारीख, उद्याचा वार, कालच्या आठवणी यांचेही सोयरसुतक उरत नाही. चमचमत्या चांदण्यांनाही शेवटी शापित जगात जावे लागते, हे सत्य मात्र कळते. पावसाळ्या रात्री आभाळात मळभ दाटलेले

असावे, तसे दाट उदास सावट या कवितेवर झाकोळले आहे. ' तू ने अवघं पेटलंय् जीवन.' ही या मनाची जीवघेणी व्यथा आहे. या व्यथेमध्ये बरसता श्रावणही शुष्क, कोरडा होऊन जातो, पेटत्या वणव्यात उडण्याची धडपड करणाऱ्या पंख झडल्या पाखरांचे प्राक्तन इथे वाट्याला येते. कुणी तरी नक्षत्रांचं देणं देत अवघं जीवन ओवाळून टाकतं, आपलंच घर उन्हात बांधून घेतं पण त्या दुसऱ्या कुणाला मात्र याची एक चिमुकली खूणही जपता येत नाही. ओवाळलेल्या आरतीची जाण उरत नाही. सावलीची किंमत कळत नाही, असा हा सगळाच उफराटा, विपरीत डाव आहे. इथे पायांखालच्या मातीलाही लैला मजनूंच्या प्रीतीचा शाप बाधलेला प्रत्यही जाणवतो. आणि ' ना हुंकार, ना नकार ' या जीवघेण्या साशंकतेनं मन भ्रमत राहते. ' जगायलाही कुठे तरी ऊब लागते ' हे या मनाचे व्याकूळ मागणे आपलेही चित्त अस्वस्थ करून सोडते. इथे सुखदुःखांचा हा सारा हिशेब चालतो, तो केवळ कवितेच्याच संगतीने. ' डोळ्यांतलं पाणी अनावर कवितेतूनच बघायचं. पावलांचा बहर झडलेला, कवितेतूनच चालायचं. ' ही या जीवनाची रीतच झाली आहे. आपल्याच डोळ्यांत वस्तीला उतरलेले उन्हाळे आणि तळहातांच्या रेषांवरून घरंगळून गेलेले पावसाळे हेच या जन्माचे माप ठरते. पण वेदना इथे पाठराखणीसारखी वसतीलाच आली आहे. तिच्याबद्दल कोणतीच तक्रार किंवा गाऱ्हाणे नाही. मनात कटुता किंवा विखार नाही. ही वेदना अशी आपलीशी झाल्याने इंद्रधनुष्याचे दान जितक्या सहज-पणे दिले जाते, तितक्या सहजपणे काळे आकाशही स्वीकारले जाते.

या संग्रहातील आईबद्दलच्या कविता अतीव प्रेमादराने ओतप्रोत भरलेल्या आहेत. आईच्या वात्सल्याकडे पाहून ' तू आभाळ, की तू समुद्र, की माती, ' असा प्रश्न कवयित्रीला पडतो आणि मग जाणवते, की हे सगळेच तुझ्या काळजातून कधीतरी घरंगळलेले तुकडे आहेत. या आईच्या कविता अवघ्या स्त्रीत्वाचाच सन्मान करणाऱ्या, तिचीच महती गाणाऱ्या आणि तरीही तिला जाग आणणाऱ्याही आहेत.

या कवितांची प्रकृती अशी, की बरेच वेळा एकेका भावगर्भ पण साध्यासुध्या ओळीत सगळी कविताच सामावलेली असते. ' खडकांच्या कवितांत ' ' खडकांना आठवणींची घरं उभारण्यासाठी छप्पर कोण देईल ?' ही ओळ मनामध्ये अशीच ठसते. तसेच ' स्वतःच्या पायांवर कधीही उभे न राहिलेले माझे आयुष्य मी कवितेच्या प्रवाहात झोकून दिले, नि जन्मजात पायांचा वारसा मागितला, कवितांना मी मोरांचे पाय दिले, कवितेतून मी माझे आयुष्य वजा केले, प्रत्येकाला जन्मजात वारसा मिळत नाही.' यांसारख्या ओळी कवयित्रीच्या अंतर्मनाचेच दर्शन घडवितात आणि तितक्याच अस्वस्थही करतात. या कवितेशी तिच्याच भाषेत बोलावे लागते, तिचीच बोली स्वीकारावी लागते, दुसरी भाषा तिला कळणार नाही आणि तीच स्वीकारली, तर ही कविता आपल्याला उमगणार नाही. तिच्यामधील कल्पना-प्रतिमाही तिच्या तिच्या भावाशयाच्या तळातून अलगद वर आल्यासारख्या वाटतात.

'काल सायंकाळी तुझ्या घरून उदास, उद्ध्वस्त होऊन परतताना मी साकळले होते, तुझ्या जखमेतल्या रक्तमण्यासारखी' किंवा 'काल सायंकाळी तुझ्या घरून एकाकी, वैराण आयुष्य घेऊन परतताना मी झाले तुझ्या अंगणातली झडलेली रानवेल' या प्रतिमा इथे सहजगत्याच आढळतात.

या कवितांचे आकार स्वैर आहेत, व ते अंतःस्थ भावनेनेच तिला दिलेले आहेत. तिला रेखीव आकृतिबंधही नेहमीच लाभलेले नाहीत, परिणामी सुसंगत भावाशयही कधीकधी हाताशी लागत नाही. या कवितेतील भाववृत्तीशी, तिच्या पाठीशी असणाऱ्या भावव्याकूळ मनाशी, व्यथावेदनांशी समरस झाले, तरच ही कविता मनाला भिडते तिचे तंत्र हे स्व-तंत्र आहे, तिचे स्वतःचे आहे. त्यात कोणतीही कलाकुसर किंवा वरपांगी कारागिरी नाही. अशी कोवळ्या यौवनाची, जखमी मनाची, अधू जीवनाची अंतःस्थ गाभ्यापासून आलेली, म्हणूनच अंतःकरणाला स्पर्श करणारी कविता. काहीशी स्वैर, विस्कळित, अनियमित असली, तरी ती कविताच आहे. ही कविता म्हणजे आरंभापासून अखेरपर्यंत स्वतःच्याच मनाशी किंवा वास्तवात न लाभलेल्या प्रियतमाशी चाललेला संवाद असल्याने आपण या संवादात परके, उपरे आहोत, सारेच आन्तरिक संदर्भ आपल्याला उमगत नाहीत, स्पष्ट होत नाहीत, अशी जाणीव ही कविता वाचताना बरेच वेळा होते. तरीही तिच्या शब्दांतून व्यक्त होणारी वेदना नितळ व पारदर्शी असल्याने ती नकळताच आपल्याशीही कधी बोलू लागते, संवाद करू लागते, हे आपल्यालाही समजत नाही, या कवितेचे रूप अजून फार एकेरी, एकारलेले, एकमुखी आहे. आज ते तसे असले; तर त्यात अस्वाभाविक असेही काही नाही. आज ते स्वाभाविकच मानायला हवे. कारण या कवितेचा प्रवास आत्ताशी कुठे सुरू झाला आहे. तिला अजून पुष्कळच वाटचाल करायची आहे. अनुभवांची केवळ विविधताच नव्हे, तर भावाशयाची संमिश्रताही आत्मसात करायची आहे. व्यक्तिगत अनुभवही कलेच्या, पातळीवर चढताना त्यांच्या रंगरूपावर सहजगत्याच कसे संस्करण होते, ते कसे पालटते, कोणती किमया घडते, याचे पुरेसे आकलन या कवितेला अजून व्हायचे आहे. सहेतुक प्रयत्न न करताही भावाशयाच्या साध्या अभिव्यक्तीच्या द्वारा अनेकविध कलात्मक आकृतिबंध कसे निर्माण होतात, याचा समजही या कवितेला अजून पुरेसा आलेला नाही. अनुभवाचा एकच दाहक चटका शब्दांकित करतानाच त्याचे अधिकाधिक परिपूर्ण रूप तळापर्यंत जाऊन न्याहाळण्याची साधनाही या कवितेकडून अजून व्हायची आहे. हे सारे अजून घडायचे आहे. त्यासाठी खूप वाचायला हवे, खूप जगायला हवे. अनुभवांची मनोमन चर्वणा व्हायला हवी, खोलवर जाऊन चिंतन करायला हवे. हे सारे या कवितेकडून घडावे आणि या तरुण कवयित्रीची काव्यजीवनातील वाटचाल सफल, सुंदर व्हावी, तिला रसिकांची दाद मिळावी, हीच हार्दिक शुभेच्छा !

**– अनुराधा पोतदार**

ग्रंथालय
२४८८
ग्रं. क्र. २४०००
वाङ्मय ९३१७०१८
शाखा (स्थळ प्रत)

## आठवणींच्या कविता

गच्च भरलेलं डोळयांचं तळं
सावल्यांनी भारावलेलं मनाचं आभाळ
तळयात आभाळ झोकावलंय्
आभाळात तळं डोकावलंय्
आयुष्य नुसतंच आठवणींनी ओथंबून आलंयू

⚘

ऋतूचंही हल्ली खरं नाही काही
आश्विनातही सोनेरी कोवळं ऊन
उसवत चाललंय्
अवघं आभाळ मळभानं भरून आलंय्
आयुष्यही थेट तसंच फुलायझुलायच्या दिवसांत
न रंगल्या मेंदीसारखं
नुसतंच उदास आठवणींनी झाकाळून गेलंय्

⚘

दवभिजल्या पहाटेसारखी
तुझी एकही चिंब भिजलेली आठवण
माझ्याकडे नाही
म्हणून आताशा दररोज
मीच पहाट होते दवात न्हाऊन
मीच दव होते पहाटेत गारठून
त्या आठवणींची कुठं तरी साठवण, म्हणून. . .!

तुझ्या फूलचुखी पावलांतले काटे वेचताना
माझ्या पापण्यांचा अवघा बहर झडून गेला असता
पर्वा त्याची नव्हती
पण उत्तरायुष्यात भेटलास कधी, तर
पूर्वायुष्याच्या त्या आठवणींची ओळख सांगणारी
एकच एक खूण माझ्याजवळ–
झुकलेल्या पापण्या. . .
मिटलेले ओठ. . . !

दिशादिशांच्या हुंकारासवे उडून जाताना
आपल्या घरट्याची केशरकाडी नि काडी उसवलेली–
ह्याही काड्या मी जपत बसलेय् आठवणीदाखल
मोडल्या घरट्यांची तिरडी बांधायची नसते काळजातसुद्धा
म्हणून तू भुर्रकन् उडून गेलास जगणाऱ्यांच्या जगात
इतकाही फरक पडतो का कधी आठवणींच्या हिशेबात ?

माझी आठवण म्हणून
उगाच का माझ्या सायलीच्या शब्दांना जपलंस ?
अथांग सावळ्या अक्षरांमध्ये
का मला शोधत बसलास ?
मला तर कधी जपलं नाही
सापडले, तरी शोधलं नाही

राजा ! अजूनही एक शंका–
माणसं जिवंत असताना
मढं जपण्याची का तुझ्या राज्यात पद्धत आहे ?

आकाशफुलांचं भरगच्च देणं नाही
तुझ्या ओंजळीतल्या रेषा मोजाव्यात
थरथरत्या हातानं—कापऱ्या बोटांनी
तशा मीच गोळा केलेल्या तुझ्या मूठभर आठवणी
सोबतीला डोळ्यांतलं खारं पाणी
त्यासाठी साता जन्मांची मागणी
इतक्या जन्मांचा प्रवास
नुसत्या मूठभर आठवणी आठवायला,
तर किती जन्म लागतील
हे सारं विसरायला...... ?

□ □

## परतीच्या कविता

काल सायंकाळी तुझ्या घरून
उदास, उद्विग्न, उद्ध्वस्त होऊन परतताना
मी साकळले होते
तुझ्या जखमेतल्या रक्तमण्यासारखी.
तुझ्या डोळ्यांतला सगळाच पाऊस
मी घेऊन आलेय् सोबतीला
माझा एकही ढग तुला दिला नाही
आता पाऊस फक्त गारांचाच
तुझ्या समईच्या गावच्या
सगळ्याच समया विझून जातील
माझे ढग मात्र रडत राहतील
पावसापावसाच्या आकारातून. . .

काल सायंकाळी तुझ्या घरून
भकास– भयाण– भटकं
आयुष्य घेऊन परतताना
मी झाले होते तुझ्या चित्रातली रंगबधिर रांगोळी
माझे सगळेच रंग मी ओतून आलेय्
तुझ्या पापण्यांच्या कुंचल्यांच्या सोबतीला
आता तुझ्या राज्यात फक्त रंगांचाच सडा
पालावलेले सगळेच रंग तू राखून ठेवलेस
आता रांगोळी नाही, मीच रंगबधिर
तरीही मी जपून आहे त्या रांगोळीतले
ठिपके नि ठिपके
रेषा न् रेषा ढगांच्या स्पंदनातून
तुझ्या वळवाच्या पावसातून. . . !

काल सायंकाळी तुझ्या घरून
एकाकी, वैराण आयुष्य घेऊन परतताना
मी झाले तुझ्या अंगणातली झडलेली रानवेल
माझी सगळी बहार हिरवीगार
तुझ्या अंगणातल्या झाडांना दिलीय्–
तुला सावली मिळण्यासाठी.
उन्हात करपून मला हिरवळीचाही कंटाळा आलाय्
माझे बहार तू पानापानांतून जपून ठेव
मी झडताना मात्र तू
बीजाबीजांतून झाडांची आशा रोव. . . !

काल सायंकाळी तुझ्या घरून
डोळ्यांत वाळवंट भरून परतताना
घरट्याकडे किलबिलत परतणाऱ्या पाखरांचीच
काय ती सोबत होती.
पाखरांच्या चोचीत चोची अडकलेल्या
तुझ्या अंगणाला माझ्या देहांच्या सावल्या परक्या झालेल्या
कोपऱ्यावरून वळताना सांजवात विझली होती
कारण माझं आभाळ रडताना
तुझ्या आभाळात चंद्राबरोबर चांदणी हसली होती
पाखरांच्या आवाजाचे– चंद्राच्या आकारांचे
संदर्भ स्पष्ट करणे जमत नाही
सांजवेळी मी पाण्याचा घडाही भरत नाही
भरलेल्या वाळवंटाची सोबत माझी संध्याकाळ होते
मी चंद्राची वाटही पाहत नाही. . .

□ □

## पूजेची कविता

तुझ्या पूजेसाठी आभाळफुलं खुडताना
अनावर हातांनी आभाळच खुडलं गेलं
किती रुसलास उन्हाळ्यातल्या पानांसारखा
तुझा सूर्य कोसळला, म्हणून ना !
कसलं आभाळ घेऊन बसलास ?
उद्यापासून सूर्य तुझ्याच डोळ्यांत राहील
उगवतीचा सूर्य तळहातावर ठेवताना
रांगोळीनं तुझी पावलं काढून ठेव
माझ्या शिल्लक राहिलेल्या पूजेची आठवण, म्हणून. . . !
मावळतीला सूर्य उशाशी घेताना
' रानपाखरं कुठं राहतात ?'
डोळे भिजवून असं कधीच विचारू नकोस
सूर्याला रडणं शोभत नाही. . .

तुझ्या पानामनात हळवा पाऊस, कोवळं ऊन
प्रायश्चित्त म्हणून आता मी आभाळाच्या भकास पोकळीत
माझ्याच अस्तित्वाची दगडं भरडत राहते
म्हणूनच आभाळ घरघरतं, माहीत आहे का हे तुला ?
आता मी रानपाखरांची मैत्रीण
माझ्याच कवेत रानपाखरं वेणा वाटतात
झडलेल्या पंखांची पिसं मोजतात
आमचं आभाळ खुडलं गेलंय् ना !
त्यांचा एकच मुका आक्रोश
कसं सांगायचं यांना
राजांनो ! आभाळ पंख झडलेल्यांचं कधीच नसतं
चाक नाही, ती गाडी कसली ?
पंख नाही, ते पक्षी कसले ?
ढगांच्या कापल्या पावलांसारखी मी—
माझा ठिकाणा शोधू नकोस
फक्त कधी जर तुझी पूजा रुसली,
तर तिला दाखव आभाळाची भयाण पोकळी—
जिथं मी अजूनही सूर्य होऊन जळत असते
फक्त तुझ्या पूजेसाठी. . . !

□ □

## अबोल तू

पेंगुळल्या मनांचे हुंकार
श्वास तरी, रे, किती रेंगाळलेले
तू जपूनही किती जपायचंस शेवटी
तुला आणि मलासुद्धा का खुळचासारखं
तळहातावरच्या नाजूक रेषांसारखं
चुरडलेल्या रांगोळीतल्या स्वस्तिकासारखं
कुठं भेटलो होतो आपण ? आठवतं ना ?
मला अनावर तुझ्या डोळचांतला अथांग महासागरी खोलपणा
गर्दीतही गोठवून गेल्या त्याच्या त्या अधिऱ्या खुणा
तुझ्या डोळचांत ओलावलेलं धुकं
फुलवातीसारखी थिजलेली मी. . .
तूच विदग्ध केलेले मुके डोळे
पहिल्याच भेटीत–
दिशांचे रंग– चांदण्यांचे आकार– नेत्रांचे पूर
मी ओलींचिब– मी गारठलेली
एक भटकं पर्व आयुष्याचं तू थिजवलं
तेव्हाच थांबलेलं
माझं आकाश संपलेलं ... निरांजनही गोठलेलं
मनात तुझे स्वप्निल डोळे. . .
मला हल्ली डोळेच बोलावतात
डोळेच हल्ली माझ्याशी बोलतात
तू तसा मुकाच आहेस
साता जन्मांच्या प्रवासापासून. . . !

□ □

## काही सल

तुझ्या चित्रातल्या आखीव, रेखीव रेषांना सुद्धा
धारदार कंगोरे हातांतल्या बिल्वरांसारखे
तुझ्या आठवणींच्या कंगोऱ्यांचा सल
पानावरच्या प्रत्येक हळव्या दवबिंदूवर
सांज, सकाळी, वेळी, अवेळी
जखम ही भळभळती
तरीही सल हवा आहे
कशाचा नाही, पण जखमांचा आधार हवा ना. . . !

त्या पाऊसखुणा माझ्या बुबुळांत
घेर धरू लागल्या, तसा
पापण्या झुकवून तू त्यांना मज्जाव केलास
पावसाचं पाणी छतावर अडवशील–
आठवणींचे पावसाळे कुठं ठेवशील– ?
मेंदीचं स्वस्तिक काढलेले माझे तळवे
तुझ्यासाठी तळं होतील. . .
लक्षात असू दे, ते इतकंच !

## उद्याचं गाव

आजची तारीख, उद्याचा वार, कालच्या आठवणी
विश्वास नाही या प्रांतावर. . . !
घड्याळाच्या काटच्यांबरोबर चाललंय् सगळं
कशाशी काहीही संबंध नाही
अक्षरांना अक्षरांनी आयुष्य विकणारी मी. . .
लांबी, रुंदी, उंची कशाला कालची. . . ?
आता सरसर चालते आहे
तळहातावर एक गवताचं पान,
सोबतीला एक रानफूलसुद्धा !
निर्माल्य आयुष्याचं असं असतं का ?
काटे बोचून बोचून हात रक्ताळलेले
रानफुलं हातांत आहेत, सोबतीला गवतही नाही
पुन्हा तेच-- उद्याचा वार काय ? माहीत नाही. . .
माझा उद्या अनाम वीरांच्या गावी राही. . .
समयांचे गाणे वितळत जाई. . .

□ □

## शापित जग

तूच मला घातली होतीस, बघ,
चमचमत्या चांदण्या रात्रीची शपथ
पण तुला कुठं माहीत होतं, की
मी आहे एक काळीकुट्ट अवस
तरी तू म्हणालास,
"ए, बघ ! चांदण्या कमी कमी होतायेत !"
तुला कुठं माहीत होतं, की
त्या शापित जगात जाताहेत.

□ □

## असा श्रावण

उगाच अशा दूर दूर बांधल्या भिंती
धुक्याच्या कशिद्यावरच्या पुसल्यास ना राती ?
रातताऱ्यांनी धरलाय् फेर अवतीभवती
आपलीच मनं, आपलीच नाती
तुडवलीसच ना शेवटी तू
क्षितिजावरची निळी माती...?
आता या भयाण पावसाळचा राती
मळभभरलं आभाळ हाती...
कशाला हवाय् सडा प्राजक्ती
गंधात अवघ्या विटलंय् मन
'तू' नं अवघ्या पेटलंय् जीवन
तडजोडीत तसाच कोरडा श्रावण

□ □

## पंख

धडाडणारा वणवा अन्
त्यातून उडणारे मजबूत पंखांचे पक्षी
कधी तुझ्या चित्रात बांधू नकोस
मला माझ्याच वणव्यांची आठवण येते
माझ्याच वणव्यांच्या जगात
मी झडल्या पंखांनिशी उडण्याची शर्थ करीत राहते.

□ □

## कुणासाठी . . . कुणीतरी

कुणासाठी कुणीतरी द्यावं नक्षत्रांचं देणं
घेणाऱ्याला मात्र सांभाळता येऊ नये एकही चिमुकली खूण

कुणासाठी कुणीतरी ओवाळून टाकावं जीवन
त्याला मात्र नसावी ह्या आरतीचीही जाण

कुणासाठी कुणीतरी बांधावं आपलं घर उन्हात
त्याला मात्र कळू नये साध्या सावलीचीही किंमत

कुणासाठी कुणीतरी मांडावे डावांवर डाव
खेळणाऱ्याला ठाऊक नसावा भातुकलीतला वेडा भाव. . .

कुणासाठी कुणीतरी ठेवावी खुळी आसावरी
त्यानंच वाहावी फुलं आपल्या थडग्यावरी

□ □

# शाप घराला

उन्हात नाही, सावलीत नाही
अल्याड नाही, पल्याड नाही
सातासमुद्रांपार सुद्धा नाही
असंही एक घर बांधलंय् आकाशताऱ्यांपल्याड
ढगांच्या भिंती–चांदण्यांचं छप्पर
ग्रहांच्या उभ्या–आडव्या काडांनी शाकारलेलं
आकाशाच्या मातीत नक्षत्रांची बाग
घर कसं आहे माझं. . . ? '

, छानच ! व्हेरी नाईस ! सुरेखच की !
पण एवढचा दूराचा सोस कशाला ?'

दोस्तहो, हा प्रश्न, तुम्हीच नाही, तिनंही केला होता.
अजूनही काही तिचे पाणावलेले डोळे, अडलेले श्वास
' किती, रे, अफाट हे अंतर ! अफाट हे माप ! '
याची क्षणोक्षणी देत होते साक्ष
पण प्रश्न विचारण्याआधी तुम्ही अन्
ती वेडी सुद्धा विसरली होती
या तुमच्या पायांखालच्या मातीला आहे
लैला–मजनूंच्या घराचा शाप. . .

□ □

# जगायलाही

तुझ्या दोन डोळ्यांच्या फुलवाती तेवताना
माझा जीव नुसताच होरपळत होता
मी नुसतीच जळून जळत राहिले
एखाद्या ऊनवेड्यासारखी
कधी हुंकारही नाही, कधी नकारही नाही
'तू फारच निष्पाप अन् निर्विकार सुद्धा !'
असं सगळेच म्हणतात.

मग सगळ्याच पापांची तिरडी का माझ्याच खांद्यावर ?
तसंही नाही, माझ्याही अपेक्षा माफकच
श्रावणातल्या दोन झोक्यांसारख्या
तुझ्या चित्रातल्या दोन अनाकार रेषांसारख्या
हातांवरची लाल लाल नाजूक मेंदी
किती अगतिकतेने हात कुरवाळायचे
आता हाही का माझाच दोष ?
तुझी नजर–तुझेच वेध–विदग्ध मात्र मी. . .
आता हेही का माझंच पाप ?
पाप + अभिशाप मिळून काय होतं. . . ?
चिवचिव–चिमणी, दाणा खाते, पाणी पिते
भुर्रकन् उडून जाते. . .
अनभुक्त उबेपोटी अखंड जळत्या पिसांच्या
दोन पंखांनी तुला ऊब दिली
तुला त्याची आचही लागू न देता
मी मात्र जळत राहिले
आता त्यातली पीसभर ऊब मला हवी आहे
देशील का ?
जगायलाही कुठंतरी ऊब लागते,
म्हणून तरी दे ऽ ऽ ऽ

□ □

# वलय

डोळ्यांतलं पाणी अनावर
कवितेतूनच बघायचं
पावलांचा बहर झडलेला
कवितेतूनच चालायचं
जगतो, म्हणून जगतो, असं म्हणायचं
कवितेतून स्कायलॅबसारखं भरकटत जगायचं

तुझ्या व्यवहारी जगात माझी कविता
सिगारेटच्या जळून गेलेल्या थोटकाइतकी निकामी
मला हे कळतंय्, रे !
पण तुझ्या ह्या काटचा–बाभळीच्या जगातून
जखमांचे व्रण घेऊन
पहाट–पाकोळ्यांसारखं अलगद
लाजाळूगत मिटून परतून जायचं
इतकंच माझं वलय कवितेबाहेर जगायचं
बाकी मला स्कायलॅबसारखं समुद्रातही नाही पडता यायचं.

□ □

# पावलं दुर्बोधतेकडची

हवं होतं थोडंच; पण थोडंही वळणदार
किंचित कंगोरेदार
तेढंमेढं–किंचित वाकडंही चाललं असतं
ओंजळभर नाही; पण मूठभर तरी पदरी पडलं असतं
पण प्रश्न हाच :
मूठभर, म्हणजे तरी किती असतं ?
आणि तितकंही का आयुष्याला पुरतं ?

भरल्या मनानं रित्या पदरानं
तुला सगळं सांगायचं होतं;
पण तुला रित्या मनानं, भरल्या पदरानं
सगळं ऐकायचं होतं . . !

तुझ्यात असं हे गुंतत जाणं जखमांसारखं
तुझं तसं ते उलगडत जाणं फुलांसारखं
शेवटी प्रश्न हा :
असं, की तसं ?
अश्वत्थाम्यासारखं, की कर्णासारखं ?

सगळंच असं घड्याळाच्या काट्यांप्रमाणे
निसटू लागलंय् हातांतून
नेमकं निसटतंय् काय ?
नेमकं निसटलंय् काय ?
हे कधी, कुणी कुणाला
समजावून सांगायला हवं असतं
छे ! शेवटी सगळंच
निसटणारं अन् निसटायचंच असतं

❦

अनाहूतपणे वणव्यात पेटवीत झाडं
हे त्यांचं मागच्या जन्मांचं पाप
आपल्या डोळ्यांत वस्तीला उतरलेले उन्हाळे
तळहातच्या रेषांवरून घरंगळून गेलेले पावसाळे
हेच का आपल्या जन्माचं माप ?

□ □

## विसावा

तुझ्या आश्वस्त डोळ्यांतलं विश्वस्त ऊन
मला कळत नाही, असं नाही, रे, राजा !
उन्हांच्या जाळीदार चौकटीतून तर
आयुष्य निसटत चाललंय्
पानांचा कोवळा मोहर नाही
पानगळ आपलीच असते
तितकाच तडफडणाऱ्या डोळ्यांच्या
मासोळ्यांवर आपला हक्क
सदाफुली विसरून जा, हवं तर
सोनचाफाही फसवाच असतो
उन्हाळ्यातला गुलमोहोर बुबुळांत
रुजवून ठेवायला विसरू नको
वहीत जाळीसाठी खेळ म्हणून जपायची पिंपळपानं
आपण मात्र ऐकत जायचं
फाटत जाणाऱ्या केळीच्या पानांचं गाणं
नजर उंचावून मोरपिसारा सगळ्यांनी बघायचा
झुकल्या पापण्यांनी
आपण मात्र
ओबडधोबड पावलांचा आकार टिपायचा
आठवण म्हणून काय करायची इतरांची सूर्यफुलं ?
हात रक्तबंबाळ झाले, तरी
आपण जपायची आपली काचफुलं
त्यांच्यावर आपला जन्मसिद्ध हक्क. . .
– पाठराखीण आलेल्या वेदनांइतका.

अजूनही सगळं सांगायलाच हवं का ?
तुझ्या डोळ्यांतला उन्हाचा चटका माझाच आहे
मी कोमेजते
फक्त एक विसावा, म्हणून. . .

□ □

## तुझ्यासाठी

हजार चांदण्या असतील वेचल्या
तुझ्यासाठी वेचणं राहूनच गेलं
बघता बघता सगळंच असं
हे असं सांडून गेलं

हजार ओंजळी असतील वाहिल्या
तुझ्यासाठी वाहणं राहूनच गेलं
बघता बघता सगळंच असं
कोरडं कोरडं राहून गेलं

हजार नाती असतील जुळवली
तुझ्याशी जुळवणं राहून गेलं
बघता बघता सगळंच असं
तटतटा दोऱ्यासारखं उसवून गेलं

हजार नक्षत्रांचं देणं असेल दिलं
तुझ्यासाठी देणं राहूनच गेलं
बघता बघता सगळं असं
नको तेच घेणं घेतलं गेलं

हजार मरणं असतील जगले
तुझ्यासाठी जगणं राहूनच गेलं
बघता बघता सगळंच असं अगदी
फाटकं मरणसुद्धा राहून गेलं
रेंगाळणाऱ्या स्वप्नात . . . !

□ □

फुलांना आता मी कसं सांगू ?
त्यांना रंगबधिर कुणी केलंय् ?
तू केवडा झालास, म्हणून मला अपेक्षा वासाची
इतकाच ना माझा गुन्हा ?
केवडाच काटे होऊन बोचायला लागतो
हे जर माहीत असतं, तर
निवडुंगाचे काटे सोडून मी कधीच
सायली झाले नसते
निवडुंगाची पानं ... सायलीची रानं ... जळून गेलीत
रंग अन् मी ... फुलं अन् मी
एकमेकांशी एकजात बेइमान
तेव्हा ही रंगबधिर रंगपंचमी तू पाहू नकोस
तुला त्याची सवय नाही
इंद्रधनुष्य तुझंच आहे. काळं आकाश मला देऊन टाक
रंग तू ठेवले नाहीस, तर माझ्या फुलांनी उधळायचं कुणावर ?
माझ्या सूर्यानं उगवायचं कोणत्या डोंगरावर ?

□ □

# अस्तित्व : काही पैलू

तू आभाळ झालास, तेव्हापासून
मी चांदण्याच्या फुलांचा गजरा माळणं बंद केलंय्
तुझ्या अस्तित्वाची
पाठमोरी खूण सुद्धा नको, म्हणून.

⚘

माझ्या काळ्या–सावळ्या ढगांमध्ये जगणं नको, म्हणून
तुझ्या निळ्या–जांभळ्या ढगांनी उभा जन्म नाकारला
पाऊस पडायचा थांबला नाही
पण आता भर उन्हाळ्यात गारांचा पाऊस . . .

⚘

तू सूर्य झालास,
तेव्हापासून मी सूर्यफूल झालेय्
का ? कशासाठी ?
तुझे कागदी फुलांइतके अर्थशून्य प्रश्न
मी तशी अनभिज्ञच
पण एकच, अजून थोडं जळणं बाकी आहे . . .

⚘

फेसाळ लाटांनी गावीत फुलांची गाणी
आयाळ काठांनी ऐकावी काट्यांची गाऱ्हाणी
उन्हांचे क्षितिज झुकताना जन्माला आले
तेव्हापासून मी काठ होणंच पसंत केलंय्

⚘

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २४०००
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मी शंख–शिंपल्यांची कविता होऊ लागले,
तसं तू शब्द व्हायचं टाळून गेलास

खरं तर त्याच उंबरठ्यावर आपण
निरोप घ्यायला हवा होता
निदान आज तुझ्या दारावरचं
तोरण म्हणून मिरवले असते.

राजा ! माझ्या डोळ्यांतल्या जडभार पावसाने
तुझा सूर्य नाही – त्याच्या कोवळिकेची ऊब
काळीजतळात साठवलीय्
म्हणून आताशा ह्या उष्ण समुद्रात
मी थंड प्रवाह होऊन वाहत असते.

वादळवाऱ्यानं झाडं उन्मळून पडताना
तुझ्या पापण्यांची पाखरं फडफडलीही नाहीत
पाणावलीही नाहीत – ओलावलीही नाहीत
पूर्वीच पानांच्या श्वासांतून हे पाहिलं असतं,
तर तुझ्या पापण्यांच्या पाखरांना विसावा, म्हणून
मी झाड झालेच नसते. . . .

तुझ्या पानगार डोळ्यांच्या वस्तीला
माझ्या आयुष्याची पालं कधी उतरवणार नाही
तडे पडलेल्या जमिनीत माझी बुबुळं मी रुजवून ठेवली
पानथरलेल्या डोळ्यांच्या बाहुल्यांतून तू खुशाल म्हण,
"वेडी . . . . वेडी तू . . . !"

ቀ

कापल्या पावलांच्या ढगांनी पाऊस दिला
त्या पावसात मोर नाच नाच नाचला
मोराला वाटले, आपले पाय देऊन टाकावे
त्याचे पाय कुरूप. तो नाचायचे थांबला
ढगांचा रुसवा – आभाळाचा रुसवा
पावसाचा काय भरवसा, राजा . . . !

ቀ

भीज भीज गारांच्या पावसात भिजले
'किती गारठलीस !' इतकंही साधं विचारलं नाहीस.
तू ऋषिमुनींसारखा व्रतस्थ – तटस्थ
तुझा अन् माझाही समज
न मागताही तुझा कोट माझ्या खांद्यावर आला
वरातीतल्या तटस्थ बघ्यांनीही उत्सव सुरू केला. . . . !

□ □

## आईच्या कविता

आभाळाचे डोळे ओघळताना
मातीने गारांच्या जखमा झेलल्या
अवघं आयुष्य दान करून
तिनं मात्र गर्भारपणाच्या वेदना सोसल्या.

रात्र वगळून चंद्र–ताऱ्यांची स्वप्नं
पाहण्याचे दिवस कधीच सरले
चंदनाच्या चिता पेटवाव्यात
असे आयुष्य तरी, आई,
आता तुझ्याशिवाय कोणाचे उरले ?

कबीराच्या दोहृयातील एखादी ओळ गुणगुणताना
फुलांसारखं प्रेतावर झुकून जगणंही सुसह्य होतं
आईची कविता लिहिताना, लिहिलेली कविता वाचताना
स्वस्तिकी पावसाचं पाणी कवितेच्या वहीत कोसळतं.

कोर्टातला बेलीफ घसा फोडून ओरडताना
आरोपीलाही फुकटचा साक्षीदार बचावासाठी मिळतो
वृत्तपत्रांच्या पानापानांतून
दररोज तुझ्यावर बलात्कार होत जातात
तुझ्याच पोटचे गोळे अक्षरांनाही घाबरून
अक्षरांच्या समूहासमूहांतून पळून जातात

विसर आता ते ऋतू–
दगडांचा वर्षाव थांबवणारा येशू जन्माला यायचे
आता तर दिवस आले मंगळावर राहायला जायचे . . . !
मातीला आभाळावर नांदवायला न्यायचे.

□ □

काल रात्री माझ्या स्वप्नात पाऊस आला
बिछान्यात मात्र डोळे तुझेच झिमझिमत होते
आभाळातला पाऊस संपणार नाही, थांबणार आहे
तुझं वात्सल्य आटणार नाही
ऋतूंच्या भयाण उन्हाळ्यातही
पाऊस फक्त पावसाळ्यात
तुझं ओथंबणं अव्याहत थेट गारांच्या पावसासारखं
म्हणूनच का तू इतकी रिमझिमते का, ग, आई . . . !
पागोळ्यांचा सडा खचून पडला, तरी
गालातल्या खळीत हसत हसत ऊन जपते
खारा समुद्रही, म्हणे, तुझ्या काळजात मावतो
मग तू आभाळ, की तू समुद्र, की तू माती ?
हल्ली त्यांचाही तसा भरवसा नाही
तू पाऊस, की पाऊस म्हणजे तू, ग, आई ?
छे ! हे सगळेच कधीतरी तुझ्या काळजातून
घरंगळलेले तुकडे आहेत
आता कशी म्हणू, तू आभाळभर मोठी आहेस !
त्याचीही कवचं – किनारे – कंगोरे भेदून
तू कधीच पल्याड आली आहेस,
तुझ्या कुशीतून जगाने श्वासाचा पहिला हुंकार घेतला, तेव्हा !

□ □

## आईची कविता

वेणांच्या आभाळात वेणांचा पुनर्जन्म होतानाही
हसून हिरव्या गर्भारपणातून आयुष्य वाटणं बंद कर
इथं रोमिओ होतो; इथं मजनूँ होतो
सारेच जीव देतात तिच्यासाठी
तू पूजा होऊन आलीस, तरी
ओवाळलंय् का आयुष्य कुणी तुझ्यासाठी ?
इथं आता कुणीही कर्ण नाही
सगळेच एकजात भणंग भिकारी
किती पदर फाडणार आहेस आता भिकाऱ्यांच्या झोळ्यांसाठी
आता तो पदरही तुझा नाही
म्हणून तर दिवसाढवळ्या गाढवावर तुझी विवस्त्र धिंड निघते
म्हणून तरी तू आयुष्य वाटणं बंद कर.

उन्हांच्या झळा डोळ्यांचे कढ काळजात दडवून
पदराआडून पांढऱ्या श्रावणसरी होऊन कोसळणं बंद कर
स्कायलॅब पडून पडून समुद्रही आटणार आहे
उपग्रहांचं ओझं न पेलवून आभाळही फाटणार आहे
राज्यक्रान्त्या, समाजक्रान्त्या, रक्तक्रान्त्या
या मातीत होऊन गेल्या

तूही एकदा क्रान्ती होऊन तर बघ
मातीने सगळेच ऋतू खतांचे पाहिले
पानाफुलांच्या आठवणी जपायला तिला वेळही नाही
तू एकदा पानाफुलांची आई होऊन तर बघ
कावळयानें कोकिळेची अंडी उबवण्यात जगण्याचा एक अर्थ
असतो

रात्र रात्र यांच्यावर चंद्र निथळत ठेवलेस
वणव्या वणव्यांतून तू तुझं आयुष्य पेटवून दिलंस
तरी तुझ्या मायेच्या राज्यात
गाईची हाडं गाईच खातात
पोलीसही गप्पकन् तुझे डोळे विझवतात
तुझी अवस्था मातीचे पोपडे निघाल्यासारखी
गांधारीच्या डोळयांना कुंतीच्या गर्भाला
आरपार स्पर्शून जाणारा एक क्षण
टयूब-बेबीचाही शोध लावून गेला

'Frailty ! Thy name is woman !'
असं कोण, शेक्सपिअर सांगून गेला ?
आता तरी तू मोनालिसा होऊन हसणं बंद कर.

भैरवी संपताना जन्माला आलीस, तशी तू आजन्मव्रती
मग जातींची, धर्मांची लेबलं तुझ्या कपाळावर कशाला हवी ?
त्याग तुझी जात आहे, जळणं तुझा धर्म आहे
भांगेत भरल्या लाल कुंकवाची तुला आता शपथ आहे
आई, तुझी अन् सूर्याची जात एकच आहे
तेव्हा तू आता जातीची नाहीस, जमातीची नाहीस
एकदा माणसांची आई तर होऊन बघ
प्रत्येकच आई मदर तेरेसा असेल.

सोने स्टँडर्ड प्रति १० ग्राम १६८६ रु. झाले
तसे चांदण्यांच्या अनासक्त देहांवर
कुटुंबनियोजनांचे त्रिकोणी आकार उमटू लागले
पुसून गेला, मातृसत्ताक रांगोळीचा प्रकार
आई नावाच्या जोगिणी, तुझ्या मंगळसूत्रावरही टपलेत,
ग, सावकार !
मेंदीची पानं तुझं कुंकू होतील
तू डोळ्यांच्या वाहुल्यांचं मंगळसूत्र मिरवणं बंद कर . . . !

गर्भारपणाच्या भरत्या, वांझपणाच्या ओहोटचा सोसण्यापेक्षा
समुद्र व्हायची तुझी जुनी सवय आता तू सोडून दे . . .
आता तू शिवबाची जिजाई नाहीस, जीझसची मेरी नाहीस,
रामाची कैकेयी नाहीस, हॅम्लेटची गर्टरुड नाहीस
इतकं कशाला ? आता तू ॲडमची ईव्ह होणंच सोडून दे !
कुठल्याच रायगडावर कुठलाच शिवाजी
कुठल्याच समुद्र–किनाऱ्यावर कुठलाच श्रावणबाळ
पोरका होऊन तुझी साधी आठवण देखील काढत नाही
तेव्हा तू आता आई होणं सोडून दे . . . !

□ □

## खडकांच्या ३ कविता

खडकांवर बसून घनव्याकूळ क्षणी
शंख–शिंपले वेचले – वाळूचे किल्ले बांधले
किल्ले बांधल्यावर आपण खडक विसरलो
दुरावलोच कधी जर आपण
तर खडकावर येऊन बसायचे, असे आपण ठरवले
खडकाचे अस्तित्व आपल्यांत कसे मिसळले ?

❦

खडकांना गाव नसते, म्हणून तू उदास झालास
ऐन मोसमातलं माझं गाव तू विस्कटून गेलास
खडकावरची उदास संध्याकाळ
खडकांसह मला नाकारते
आता मी कुठल्या स्वीकारात जगू ?

❦

खडकावर तू अन् मी देहभार गोठलेलो
खडकावर चंद्र उतरतो . . . तू स्वस्तिक काढतोस . . .
किती वर्षांनी आज खडकावर आलो
स्वस्तिक तसंच आहे
खडकाजवळ जपण्यासाठी स्वस्तिकाशिवाय काय आहे ?
खरं तर हीही आठवण आपलीच
खडकांना आठवणींची घरं उभारण्यासाठी छप्पर कोण देईल ?

□ □

## कविता सूर्याची

'देदीप्यमान सूर्य तुला लाभो !'
म्हणून विझता विझताही दहा सूर्यांचे
तेज घेऊन येणारे तुझे शब्द
आता माझं अस्तित्व एक समई
शब्दांतच तेवायचं, शब्दांतच पोळायचं
रणरणत्या उन्हात सगळं झडताना
गुलमोहराचा लाल सडा खचून पडावा
हे खरं तर गुलमोहराचं आभाळभर मोठेपण
उन्हाळ्याला ओंजळभर तांबूसपणा द्यावा
हे त्याच्या हिरव्या मनाचं हळवंपण
तू तुझे शब्द वासंतलेला गुलमोहर
मला आता अंधारात परतायचीही घाई
जाता जाता सोबतीला दोन पाकळ्या घ्याव्यात
पण आता तेही नाही
एकच थरकाप भीतीचा
किती जपायचा मोहर झडणाऱ्या पापण्यांचा ?
पापण्यांत आलेलं पाणी निथळलं, तर
विझून जाईल माझ्या अस्तित्वाची समई
विझलेल्यांना तशी विझायची भीती नाही . . .
विझण्यासाठी जन्म आपुला—सात जन्मांची सवय आहे
तरीही व्हायचंय् एकदाच समईतल्या लक्ष ज्योती
जेव्हा सूर्य असेल, तुझ्या तळव्यावरती
कारण आता एकच
तुला माझा एक सूर्य पाहायचाय्
मला तुझे दहा सूर्य पाहायचेत . . .

□ □

## काट्यांच्या कविता

काटयांच्या प्रदेशांना फुलांची राखण
फुलांना आता रडण्याचा अधिकार काय ?
फुलांनाही लोकशाही, समानता कळायलाच हवी
सगळाच सोसण्याचा हक्क काटयांना नसतो
सगळयांना सगळं सोसता यायलाच हवं . . .
लोकशाहीत जन्माला येताना
फुलांनीही रडणं शिकायलाच हवं . . . !

✤

उन्हाळयात जमिनीचा गर्भ भेगाळताना
ओघळल्या डोळयांनी पाहिला
पावसाळयाला पाऊस देणं परवडण्यासारखं नव्हतं
म्हणून बायबलचं गॉस्पेल होऊन
मीच काटयांच्या गर्भातून अंकुरायचं ठरवलं

✤

फुलांनी काय काढावा ऋतूंचा आराखडा ?
ऋतूंनी बेतल्या आयुष्याप्रमाणे फुलांचा
फुलांसाठी काटयांचा चाललाय् पहारा खडा

✤

फुलांनी काय मोजावं ऋतूंचं आयुष्य ?
फुलांना फक्त एक संध्याकाळ हवी असते
ऋतूंनीच काटयांना साक्ष ठेवून मोजावं फुलांचं आयुष्य
त्यांना उजाड रानं पाहायची सवय करायची असते.

✤

आयुष्याच्या पालख्या अडकवून ठेवायला हव्यात
आगंतुक वडाच्या झाडांवर
वरातीतले सगळेच घोडे नाचू लागलेत काटे सोडून
सकवार फुलांच्या सड्यांवर

फुलांच्या पाकळ्या नाजूक असल्या,
म्हणून काय झालं ?
फुलांनाही बहर काट्यांचे असतात
फुलांना जपणाऱ्या देठांचे पाय किती सोशीक असतात
काटे झेलले, तरी का सगळ्यांना सोशीक पाय मिळतात ?

□ □

## अलिप्ततेच्या ३ कविता

मला असंच राहू दे
माझ्या आयुष्याच्या वळणाबाबत अलिप्त
पाणी भरलं, तर ठीकच आहे
नाही तर चालू लागावं
अनोळखी हाताबरोबर स्मशानात
थेट माठासारखं . . . !

❦

रेषा रेषांत गुंतताना
फुलांच्या आकारात गुंतत गेले
तू अनोळखी होऊन गर्दीत बुडताना
उभे मोरपिशी आयुष्य माझ्यासाठी
फुलांतून निसटल्या पाकळ्यांसारखे अलिप्त झाले . . .

❦

'तू माझ्यासाठी चंद्र हो' असं मी कधी म्हटलं नाही.
तू असा घनव्याकूळ झालास
मला रडूही आलं नाही
तू म्हणालास,
"तू माझ्यासारखा किनाऱ्याचा विचार करतेस का ?"
मी नुसतेच डोळे मिटले, कान झाकले. खोल . . . गडद.
तू म्हणालास,
"तू इतकी अलिप्त – तटस्थ – का असतेस ?"
तुझ्या घनव्याकूळ पुरातून मला किनाऱ्याची आस सहन
होत नसते
आता मीही कोसळले. आपल्याला कोण सांभाळील ?

## सावरकरांच्या ३ कविता

चौखूर उधळलेल्या घोड्यांच्या टापांखाली
चुरगळलेला माझा गाव अन् गावकरी
कोल्ह्यांसारखी बनेल जात यांची
घोड्यांनाही करून ठेवते देवावतारी
माजघरातल्या समईचा सावकारी प्रकाश
निर्जीव फोटोवर तेजाळतो
या गावात एक महात्मा जन्माला येऊन गेला,
असा जयघोष सारा गाव करतो
त्याच्या जन्मदात्या घरात मात्र काळोख घडे भरून राहतो

बाजारातल्या मूठभर फुलांचे गाव वाहून गेले
प्रेतांवर झुकताना
त्याच्या देशभक्तीचे हजारो पावसाळे अनावर झाले
समुद्रात भिजताना . . .

कविते, तू धन्य झालीस
तुझ्या हातून त्याने पेटवला वणवा
जन्मदात्या मातीत नाही त्याच्या आठवणींचा दिवा
तुला त्याच्या ओळखीचे काय संदर्भ द्यावे, माझ्या गावा
भर बाजारात आपला जन्म झाला वेसवा
संदर्भासाठी तुळशीची पानं नाहीत
वेसवांच्या पायांखालची फुले वेचून घ्या.

□ □

## पावसाच्या ३ कविता

भरल्या डोळ्यांचे सगळे संदर्भ
पावसाळ्यांना बहाल केले
खूप पाऊस आला ! कसं करू कबूल ?
तुझ्या आठवणींच्या होड्या पावसात सोडण्यासाठी
माझ्या रस्त्यांनाही पावसाची चाहूल.

पाऊस देहभार दूर
डोळ्यांत उभे पूर
भिजे काळजाचा तळ
पापण्यांत भरले आभाळ.

माझ्या स्वप्नांच्या इलाख्यातला पाऊस
तिथल्या प्रत्येक नदीत तुझ्या आठवणींच्या होड्या सोडल्या
सगळ्या नद्या भरून गेल्या
खूपच होड्या शिल्लक राहिल्या . . .

□ □

तुझ्या आठवणी तुला सांगण्यासाठी काय करू ?
मैलाचं अंतर सांगणाऱ्या दगडावर
का आपल्या प्रत्येक आठवणीचं नाव कोरू ?
कोरीनही; पण दगडं मेण झाली, तर . . . !

⚘

मी कवितेतून अन् जगण्यातूनही खूप जळते
म्हणून तुला आवडेनाशी झाली देवघरातली फुलवात
फुंकरीने विझवता येते देवघरातली फुलवात
पण बरी नसते, रे, ही जाळणारी पारध्याची जात.

⚘

संदर्भासह स्पष्ट झालेलं तुझं आयुष्य
तुझ्या कवितेच्या वहीत मावून जाईल
संदर्भाशीही अनाम राहिलेलं माझं आयुष्य
कीटस्‌ने फॅनीवर लिहिलेल्या एखाद्या कवितेवरही
कुर्बान होऊन जाईल.

◻ ◻

स्वतःच्या पायांवर कधीही उभं न राहिलेलं
माझं आयुष्य मी कवितेच्या प्रवाहात झोकून दिलं
कवितांनी जन्मजात पायांचा वारसा मागितला.
कवितांना मी मोरांचे पाय दिले
कवितेतून मी माझे आयुष्य वजा केले
प्रत्येकाला जन्मजात वारसा मिळत नाही.

फुलांचे श्वास रात्रीने हुंगलेले
रात्रींचे आयुष्य सुगंधात मंतरलेले
कवितेच्या शब्दाशब्दांत आयुष्य बुडालेले
सगळ्या कवितांच्या वह्या हरवल्या, तरी
तुला विसरणे कठीण झालेले

सकाळ दाटली धुक्यात, गर्दीच्या डोळ्यात आली संध्याकाळ
घरट्यातली हरिणी घरट्यातच जखमांशिवाय घायाळ.

□ □

रेषारेषांतून आलेख चढत्या क्रमात वाढत गेले
वाढत्या वयातल्या वाढत्या स्वप्नांच्या जगात
उणिवांचे पावसाळे फुलपंखी ऋतूंबरोबर बरसत राहिले...!
उणिवांच्या पावसाला उन्हांचे हक्क ठेवणेही नाही परवडले.

रात्रीत भिजल्या पावसांचे संदर्भ काय देऊ तुला ?
मी रानफूल, रंगविहीन माझा झूला
जोगिणीच्या भरवस्तीत माझा इलाखा वसला
मीरेच्या ओघळल्या डोळयांतला अर्थ
आता तरी कळेल का तुला ?

'दे दान, सुटे गिऱ्हाण' करण्यासाठी
अमावास्या मागणारे दोन हात फिरावे लागतात
भोई होऊन आयुष्याच्या पालख्या करण्यासाठी
नामा–तुकाच्या दिंड्या तरी निघाव्या लागतात...

□ □

REFBK-0024000
REFBK-0024000

कधी तरी वेचलेल्या आठवणी
मोजायला तुझं नाव पुरेसं आहे
आता उधळलेल्या आठवणी
माझ्या आभाळात मावेनाशा झाल्यात
थोडा वेळ तुझं आभाळ उसनं दे
ऋतूंच्या बदलत्या जगात आठवणी वाहून जातील
तेव्हा तुझं आभाळ परत घे . . . !

फुंकरीत सूर्य विझवावा
असे श्वास माझ्या देहात नाहीत
तुझ्या मुक्ताईचे डोळे मिरवावे
असे चैतन्य माझ्या बुबुळांत नाही
तुझ्या पावसाने माझ्या उन्हाचे हात मागावे
असं तेज खरं तर माझ्या सूर्यात नाही.

□ □

## संदर्भाच्या सीमेवरची कविता

टाळता येत नाही, रे, तिन्हीसांज
पहाट पाकोळयांच्या जगात ढळणारी
सगळयांनाच देहधर्म नाकारता येतात, असंही नाही
पाकोळयांवर व्रण घेऊन चालणारेही खूप असतात
मोहमयी जगातले आरसे प्रतिबिंब नाकारतील
उभा हिमालय पुकारतो आहे
पागोळयांची टपटप पावसाची रिमझिम शोधता येते
कावळयांच्या ओरडण्याचे स्वत:च्या सोयीपुरते अर्थ लावावेत
बर्फात शोधू नयेत उंटांच्या पाऊलखुणा
वाळवंटातलं ऊनही थिजवून टाकतं त्यांच्या तृषार्त देहांना
तरी संदर्भ लागत नाहीत जगण्याचे
मेणबत्तीसारखं अंतर्बाह्य गोठून जगणं थोडयांना जमतं
हुंदके देऊन आयुष्य जगलो ! कुणासाठी किती जळलो
दहा बाय् दहाचं घरही मिळेना
वृक्षारोपण करून ढोल्यांच्या शोधार्थ निघालो
देवळादेवळांतच नवस करून श्वास मागितले पानांचे
दारासमोरच्या रांगोळीतल्या स्वस्तिकातून
अर्थ लावले पाचव्या दिशेचे
तुझ्या गावच्या पक्ष्यांना नाकबूल आयुष्य रेषांचे
पंखांवर कसे काढू नकाशे माझ्या सोसण्याचे ?
नाकारू नको तो प्रसंग तू पतंग केलेंस माझ्या पंखांचे
सगळे होकार-नकार स्वीकाराच्या क्षितिजावर टेकवायचे
किनारा नसलेल्या महासागरावर आत्महत्येसाठी
आयुष्य बिनदिक्कत झोकून घ्यायचे
श्रीकृष्ण सारथ्य करणाऱ्या रथांना तरी
कशाला आपले संदर्भ ठेवायचे ?

□ □

मराठी ग्रं... महालय ठाणे
२४८८
दा. क्र. २८०००
काव्य ९३१७०१८३

शोभा सुराणाची कविता म्हणजे अेका अतिशय तरल आणि स्वप्नशील मनाचे भावालेख आहेत.

ही कविता बहरलेली आहे, बनवलेली नाही, हे सहज लक्षात येते. हा बहर बहुतांशी सुखाच्या नव्हे, तर व्यथेच्या आणि विरहाच्या वेलीवर उमललेला आहे. संयमाने दाबलेल्या आसवांचा ओलावा या कवितांच्या पाकळ्या पाकळ्यांवर जाणवतो.

डोळ्यातलं पाणी अनावर। कवितेतून बघायचं।

पावलांचा बहर झडलेला। कवितेतूनच चालायचं॥

असे लेखिकेचे कवितेशी जिव्हाळ्याचे, आधाराचे नाते आहे.

आभाळ, पाऊस, सूर्य, चांदणे, झाडे इ. मध्येच तिच्या मनाने आपल्या अनुभवांची आर्त प्रतिबिंबे पाहिली आहेत आणि ती अपरिहार्यतेने शब्दांकित केली आहेत.

शरीराच्या अपंगतेवर मात करून अेका हृद्य प्रवासाला तिने सुरुवात केली आहे. पहिल्या प्रदक्षेपात कोठे अधिरेपण, कोठे नवखेपण असणारच; पण ही वाटचाल रसिकांचे लक्ष वेधून घेणारी होईल, असे आश्वासन या संग्रहातील बहुसंख्य कविता नक्कीच देतात,

– वि. वा. शिरवाडकर